# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/१०/२०१६

**१) सार्वजनिक रोडवरील लावलेल्या सोलर लाईटची चोरी . :–**

दिनांक ०६+०७/१०/२०१६ चे रात्र दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने सोमनाळा बुज येथे ग्रामपंचायत तर्फे सार्वजनिक रोडवर लावलेल्या सोलर लाईटच्या ३ नग बॅट–या अंदाजे कि. १५.०००/–रू. च्या चोरून नेल्याने फिर्यादी सौ. रेखा शैलेश भोवते वय ४० वर्ष रा. सोमनाळा बुज (ग्राम.प.सरपंच) यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) घरातील कपाटातुन पैश्याची चोरी. :–**

दिनांक ०७/१०/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील फिर्यादीचे पत्नी ने घराचा दरवाजा खुला ठेवुन मागच्या बाजुला हजर असतांनी यातील आरोपीने फिर्यादीचे घराचे खुल्या दरवाज्यातुन आत प्रवेश करून बेडरूम मधील असलेल्या खुल्या कपाटातुन नगदी ५,०००/–रू. चोरून नेल्याने फिर्यादी लक्ष्मीचंद युवराज पाचे वय २८ वर्ष रा. रेंगेपार (सातलवाडा) यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोडंगे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) प्रेम विवाहाचे वादा वरून महीलेला मारहाण व जिवे मारण्याची धमकी . :–**

दिनांक ०८/१०/२०१६ रोजी ०८.०० वा. दर. यातील आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन संगनमत करून फिर्यादीचे घरी जावुन मुलीचे प्रेम विवाहाचे वादा वरून फिर्यादीचे स्वयंपाक खोलीत आरोपी क्र.२ यांनी मुलीचे केश ओढतान करून मारपीट केली फिर्यादी हा पत्नीला मारू नका असे म्हणुन आडवा झाला असता आरोपीतांनी फिर्यादीस व त्याची पत्नी व आईला शिविगाळ करून जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यशुदास धर्मदास चौबे वय २५ वर्ष रा. मेंढा भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५२,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६, भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) संगनमत करून जादुटोण्याच्या कारणावरून पती पत्नीस मारहाण. :–**

दिनांक ०८/१०/२०१६ रोजी ०८.०० वा. दर. यातील आरोपी क्र. १,२,३ यांनी फिर्यादीस तु जादुटोना करनी करतोस असे बोलुन जादुटोण्या मुळे आरोपी क्र. ३ याचा कान दुखत आहे असल्याचे आरोपी क्र. ४ याने सांगीतल्याने आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करून काठीने डावे पायावर मारून जखमी करून फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ केल्याने त्यास वाचवीण्या करीता त्याची पत्नी हेमलता हे गेली असता तीला देखील हातावर पायावर मारहान केल्याने फिर्यादी वामन पुरूषोत्तम श्रीपाद वय ५६ वर्ष रा. मोहाडी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४,२९४,३४ भांदवि. सहकलम (१)(३)(१) महा. जादुटोना प्र. कायदा २०१३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. चौधरी पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**५) अवैद्य रित्या आमली पदार्थ गांजा विक्री करणा–यावर गुन्हा दाखल. :–**

दिनांक ०८/१०/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील आरोपी हा अवैद्य रित्या आमली पदार्थ गांजा हा विकत आहे अशा प्रकारे मिळालेल्या माहीती नुसार अमली पदार्थ कायदा यातील तरतुदीचे नियम पुर्वक पालन करून आरोपीचे घराची घरझडती घेतली असता त्याचे कडुन २७३ ग्रॅम ९०० मिली कि. २,७३९/–रू. रोख रक्कम नगदी १,०६०/–रू. १ मातीची चिलम कि. ०.० /–रू असा एकुण ३,७९९/–रू. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. सावने (अमली पदार्थ विरोधी पथक) यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २०,२२ एन. डी.पी.एस. अ‍ॅक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.